सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करणेबाबत.
**श्री. जितेंद्र विश्वनाथ कोळंबे ,संचालक**

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
16 FEB 2024
प्राप्त झाले सही........

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग,
शासन आदेश:- संलेको-२०२४/प्र.क्र. /कोषा प्रशा -२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १६ फेब्रुवारी, २०२४.

संदर्भ:- १) सहायक संचालक (प्रशासन),लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेको/प्रशा-राप/का-६/श्री.कोळंबे/१२.२३/१७५१/५६३७, दि.२२.१२.२०२३,
२) शासन वित्त विभाग यांचे आदेश क्र.संलेको-२०२३/प्र.क्र.८६/को.प्र.२,दि.२१.०८.२०२३,
३) आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे क्र.साप्रवि/२/कावि/५२०/२०२३,दि.२४.०८.२०२३,
४) प्रबंधक,सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे यांचे पत्र जा.क्र.कुलगुरु- कार्यालय/पदस्थापना/२०२३/२९८४, दि.२२.०८.२०२३,
५) सहसंचालक, लेखा व कोषागारे कार्यालय, पुणे यांचे पत्र क्र.सहसंलेको/पुणे/आस्था-३/मविलेसे(राप)/प्रतिक्षाधिन/०९/२०२३/२२७५, दि.०८.११.२०२३,
६) शासन वित्त विभाग आदेश क्र.संलेको-२०२३/प्र.क्र.८६/को.प्र.२,दि.०३.१०.२०२३,
७) सहसंचालक, लेखा व कोषागारे कार्यालय, पुणे यांचे पत्र क्र.सहसंलेको/पुणे/आस्था-३/मविलेसे(राप)/कार्यमुक्त-श्री.कोळंबे/१०/२०२३/२२७६, दि.०८.११.२०२३,
८) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे पत्र जा.क्र.मुले/३१२४,दि.२०.१०.२०२३.

**-: शासन आदेश :-**

श्री. जितेंद्र विश्वनाथ कोळंबे, शासन वित्त विभाग यांचे संदर्भ क्र.२, दि.२१.०८.२०२३ अन्वये संचालक संवर्गात पदोन्नतीने वित्त व लेखा अधिकारी, महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे येथे पदस्थापना देण्यात आली. त्या अनुषंगाने संदर्भ क्र.३ अन्वये दि.२३.०८.२०२३ (म.पू.)रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथून कार्यमुक्त करण्यात आले.

२. तथापि ,श्री.कोळंबे, वित्त व लेखा अधिकारी, महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे या पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी गेले असता संदर्भ क्र.४ अन्वये श्री कोळंबे यांना पदस्थापनेच्या पदावर रुजू करून घेण्यात आले नाही.

३. श्री.कोळंबे, शासन परिपत्रक दि.२०.०२.२००८ मधील तरतुदीनुसार,संदर्भ क्र.५ अन्वये दि.०१.०९.२०२३ (म.पू.) रोजी सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे येथे हजर झाले. श्री.कोळंबे,यांना रुजू करुन घेतल्यानंतर त्यांची सेवा उपयोगात आणणे आवश्यक असल्याने त्यांना भांडार पडताळणी शाखेचा आढावा घेण्याबाबतचे कामकाज सोपविण्यात आले.

४. शासन वित्त विभाग संदर्भ क्र.६ अन्वये दि.०३.१०.२०२३ च्या आदेशान्वये श्री.कोळंबे यांची मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे या पदावर पदस्थापना करण्यात आली.

५. श्री.कोळंबे यांना सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे कार्यालयातून पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी संदर्भ क्र.७ अन्वये दि.०३.१०.२०२३ (म.नं) रोजी कार्यमुक्त करण्यात आले. त्याअनुषंगाने, श्री.कोळंबे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे या पदस्थापनेच्या पदावर संदर्भ क्र.८ अन्वये दि.०४.१०.२०२३ (म.पू.) रोजी हजर झालेले आहेत.

233|2024|309
20|2|24

कृ.मा.प.

६. श्री.कोळंबे यांना दि.२३.०८.२०२३ ते दि.०३.१०.२०२३ पर्यंत ४२ दिवसांच्या कालावधीकरीता पदस्थापनेशिवाय राहिले आहे. श्री.कोळंबे यांचा नियमित करावयाचा प्रतिक्षाधीन कालावधी पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | कालावधी | एकूण दिवस | रजेचे स्वरुप | रजेचे कारण/शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | दि.२३.०८.२०२३ ते दि.३१.०८.२०२३ | ०९ दिवस | अर्जित रजा | संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे दि.२१.१२.२०२३ अन्वये मंजूर. |
| २. | दि.०१.०९.२०२३ ते दि.०३.१०.२०२३ | ३३ दिवस | -- | नियमित करावयाचा प्रतिक्षाधीन कालावधी |
| | **एकुण कालावधी** | **४२ दिवस** | | |

७. यास्तव, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ च्या नियम ९ (१४) (फ) च्या तरतूदीच्या अधीन राहून, संचालक संवर्गातील श्री.जितेंद्र विश्वनाथ कोळंबे यांच्या **संचालक** पदावरील **दि.०१.०९.२०२३ ते दि.०३.१०.२०२३ पर्यंत ३३ दिवसांच्या नियमित करावयाच्या प्रतिक्षाधीन कालावधीचे तसेच** लगतआधी **सहसंचालक** पदावरील दि.२३.०८.२०२३ ते दि.३१.०८.२०२३ पर्यंत ०९ दिवसांच्या मंजूर रजा कालावधीचे वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता **सहसंचालक,लेखा व कोषागारे,पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(ता.र.पवार)**
**अवर सचिव,वित्त विभाग.**

प्रत:-
१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*
३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
४) सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५) सहसंचालक,लेखा व कोषागारे,पुणे विभाग,पुणे *
६) श्री.जितेंद्र विश्वनाथ कोळंबे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे *
७) संबंधित अधिका-याचे सध्याचे कार्यालय *
८) निवड नस्ती, कोषा प्रशा -२,
* ( संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत )